(Marathi)

1017/9121

1592

20

P

1592

( पद १ ले )

## —: राष्ट्र–गीत :—

वन्दे मातरम् ॥ धृ० ॥
सुजलाम्, सुफलाम्, मलयजशीतलाम् ।
शस्यशामलाम् मातरम् ॥ वन्दे ॥
शुभ्रजोत्स्नाम्. पुलकितयामिनीम् ।
फुल्ल कुसुमित द्रुमदल शोभिनीम् ।
सुहासिनीम्, सुमधुर भाषिणीम् ।
सुखदाम्, वरदाम्, मातरम् ॥ १ ॥

( पद २ रे )

## —: मातृभूवंदन :—

अब मातृभूमि तेरे चरणोमे सिर नमाऊं ।
मै भक्ति भेट अपनी तेरी शरणमें लाऊं ॥ धृ ॥
माथे पे तू हो चन्दन । छातीपे तू हो माला ।
जिव्हापे गीत तू हो, मै तेरा नाम गाऊं ॥ १ ॥

जिससे सुपूत उपजे, श्रीराम कृष्ण जैसे ।
उस तेरी धुलीको मै, निज सिरपे चढाऊं ॥ २ ॥
सेवामे तेरी सारे, भेदोंको भूल जाऊं ।
वह पुण्य नाम तेरा, प्रतिदिन सुनूं सुनाऊं ॥ ३ ॥
तेरेही काम आऊं, तेराही मंत्र गाऊं ।
मन और देह तुझपर, बलिदानमे चढाऊं ॥ ४ ॥

---

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1592
Date 18.1.72
GOVT. OF INDIA

( पद ३ रे )

## ध्वजारोहण गीत :–

विजयी विश्व तिरंगा प्यारा । झंडा ऊंचा रहे हमारा ॥ धृ ॥
सदा शक्ति बरसानेवाला । प्रेमसुधा सरसानेवाला ।
वीरोंको हरषानेवाला । मातृभूमिका तनमनसारा ॥ १ ॥
स्वतंत्रताके भीषण रणमें । लखकर बढे जोश क्षणक्षणमें ।
कांपे शत्रु देखकर मनमें । मिट जाये भय संकट सारा ॥ २ ॥
इस झंडेके नीचे निर्भय । लें स्वराज्य यह अविचल निश्चय ।
बोलो भारत माताकी जय । स्वतंत्रताही ध्येय हमारा ॥ ३ ॥
आओ प्यारे भाईयो बहनो । देश धर्मपर बलि बलि जाओ ।

एकसाथ सब मिलकर गाओ । प्यारा भारत देश हमारा ॥४॥
इसकी शान न जाने पाये । चाहे जान भलेही जाये ।
विश्व विजय करके दिखलायें । तब होवे प्रण पूर्ण हमारा ॥५॥

---

( पद ४ थे )

## —: ध्वजावतरण गीत :—

राष्ट्र गगनकी दिव्य ज्योति राष्ट्रीय पताका नमो नमो ।
भारत जननीके गौरवकी अविचल शाखा नमो नमो ॥ धृ ॥
करमें लेकर इसे शूरमा तीस कोटी भारत संतान ।
हंसते हंसते मातृभूमिके चरणोंपर होंगे बलिदान ।
हो घोषित निर्भीक विश्वमें तरल तिरंगा नवल निशान ।
वीर हृदय खिल उठे मारलें भारतीय क्षणमें मैदान ।
हो नसनसमें व्याप्त चरित शूरमा शिबिका नमो नमो ॥ १ ॥
नव युवकों स्वातंत्र्य समरमें नवजीवन संचार करो ।
शस्त्र अहिंसासे दलकर दासता दुर्गको क्षार करो ।
क्रान्ति-शान्ति-युगमें हे वीरो जीवन सुमन निसार करो ।
ऊंचे स्वरसे एक साथ जननीकी जयजयकार करो ।

शक्ति देखकर शत्रु शिबिरमें मचे सनाका नमो नमो ॥ २ ॥
उच्च हिमालयकी चोटीपर जाकर इस उठायेंगे ।
बिश्व विजयिनी राष्ट्र पताकाका गौरव फहरायेंगे ।
समरांगणमें लाल लाडले लाखों बालि बालि जायेंगे ।
सबसे उंचा रहे, न इसको नीचे कभी झुकायेंगे ।
गूंजे स्वर संसार सिंधुमें स्वतंत्रताका नमो नमो ॥ ३ ॥

---

(पद ५ वे)

## —: कूच गीत :—

आओ प्यारे भाइयों, आओ क्रातिकारियों ।
आओ शीघ्र मातृभूकि, बंध मुक्तिके लिये ॥
नाहिं डरेंगे अब किसीसे, आवे घोर आपदा ॥
धर्मयुद्ध करनेवाले, हम तो निडर हैं सदा ॥
जयतु जननि जन्मभूमि, जयतु लोक–नन्दिनी ।
जयतु जय स्वराज्य–विभव, जयतु भुवन– मोहिनी ॥
बोलो सकल भारतीय, मंत्र वन्दे मातरम् ।
बोलो एकसाथ मिलके, जय स्वतंत्र भारतम् ॥

कमर कसके निकल पडो, शान्ति युद्धके लिये ॥
अमर देखके होयें चकित, इ.से मिलनके लिये ॥
गांधिजीने हुकुम दिया, मरतेतक लढेंगे हम ॥
इन्किलाब जिन्दाबाद, कहके सब भरेंगे दम ।

---

( पद ६ वे )

गूंजे आझादीका नाद । इन्किलाब झिंदाबाद ॥
भारतके हम है रणवीर । सत्य हमारा है समशेर ॥
सत्याग्रहीका सिंहल नाद । आत्मानंदका अंतर नाद ॥
गाली गोली जप्ती जेल । जालीमका है अंतिम खेल ॥
हम सब हाथमें हाथ मिलाये । दुष्ट जनोंका राज्य हिलाये ॥
मजदूरोंका मंगल नाद । गांधीजीका शांतिनाद ॥

---

( पद ७ वे

## –: आह्वान :–

चाहती है माता बलिदान, जवानो उठो हिंद संतान ॥ धृ ॥

हंसते हुए फुलसे आकर, शीश झुकादो मांके पगपर ।
कटता हो कट जानेदो सर तनिक न होना म्लान ॥ १ ॥
उठो अपढ मूरख विव्दानों, हिंदू मुसलिम औ क्रिस्तानो ॥
जैन पारसी सिख महानो, प्यारा मांके प्राण ॥ २ ॥
ओ छात्रो भावी अधिकारी, उठो उठो निद्रित व्यापारी ।
उठो मजूरो दीन भिखारी, दुखी दरिद्र किसान । ३ ॥
स्वार्थ और मतभेद मिटाओ, बैर फूटको दूर भगाओ ॥
फहराओ जग आज हिंदमें, फिर जातीय निशाण ॥ ४ ॥
फांसी चढो जेलमें जाओ, भय वश कभी न देश भुलाओ ॥
हथ काडियोंपर मिलकर गाओ स्वतंत्रताका गान ॥ ५ ॥
उठी गगन झंकार सुखारी, गांधी वीणाकी अति प्यारी ।६॥
बनकर वीर उठो दिखलादो कालों में है जान ॥ ६ ॥

---

(पद ८ वे)

## –: ध्वज गीत :–

नव हिंद राष्ट्र झेंड्या । प्रणामा घे या ॥ ध्रु ॥
हिंद भूमिच्या हिंदी जनांच्या । स्वाभिमान चिन्हा ॥ १ ॥

स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती । बा फडफडणाऱ्या ॥ २ ॥
स्वराज्य माझे मी ही त्याचा । जगता सांगाया ॥ ३ ॥
हिंद पुत्र हे सिद्ध तुझ्या स्तव । प्राणही अर्पाया ॥ ४ ॥
नव्या मनूचे शिलेदार हे । नमिती तुजला या ॥ ५ ॥

---

( पद ९वे )

हिंद भूमीचा । हा विजय ध्वज देशाचा ॥ ध्रु ॥
परवशतेच्या तीव्र यातना । हालावितील ज्या ज्या जीवांना ॥
मुक्तिमार्ग दावील अशांना । आत्म शुद्धीचा ॥ १ ॥
हिंद माईच्या ज्या तनयाला । तनु अर्पावी जनसेवेला ॥
वाटे ऐसे तोच शोभला । पूत मायचा ॥
मिरवील ध्वज देशाचा । हिंद भूमिचा ॥ २ ॥
राष्ट्राच्या प्राणाचा ठेवा । सकलांनी हा सांभाळावा ॥
पंच प्राणे ओवाळावा । अशा मानाचा ॥
वंदू हा ध्वज देशाचा । हिंद भूमीचा ॥ ३ ॥

---

( पद १० वे )

## —: भुपाळी :—

उठोनिया प्रातःकाळी । स्मरावी देशभक्त मंडळी ॥
पारतंत्र्य पातकाची होळी । स्मरण मात्रे होईल ॥ १ ॥
सकळही स्वातंत्र्याचा ठेवा । आधीं आत्मदेव चिंतावा ॥
प्राणि मात्राचा विसावा । सदाकाळी सुखरुप ॥ २ ॥
आता वंदू हिंदमाता । परदास्यानें आति पीडीता ॥
स्वातंत्र्याच्या सिद्धी करितां । अहर्निशी तळमळते ॥ ३ ॥
स्वराज्य मंत्राचें महर्षि । पूज्य दादाभाइ नौरोजी ॥
राष्ट्रीय महा सभेमाजी । अग्रपूजा पावले ॥ ४ ॥
काढुनि भगवद्गीतासार । वदले बाळ गंगाधर ॥
स्वराज्य माझा जन्मसिद्ध । हक्क आहे निःशंक ॥ ५ ॥
तकली चरखा घेऊनि हाती । सांगे साबरमतिचा यति ॥
खादीनेच स्वराज्य प्राप्ती । अति निश्चित होईल ॥ ६ ॥
बांधुनि करी वीर कंकण । मोतीलालचा नंदन ॥
स्वातंत्र्याचें रण कंदन । आनंदानें गुंगवितो ॥ ७ ॥
शुरा वीरा रण मर्दानी । दुर्गाताई सरोजिनी ॥
प्रातः स्मरणी देशबंधूनी । अत्यादरे स्मराव्या ॥ ८ ॥

राजकारणी विठ्ठलभाई । सत्याग्रही वल्लभभाई ॥
मालवीय लजपतराय । शांति संगरी आदर्श ॥ ९ ॥
करु नये देश द्रोह । विनविती वीर वामनराव ॥
टिळक गांधी अनुकरणीय । बापूजीने दर्शविले ॥ १० ॥
शौर्य धैर्य मुर्तिमंत । भगतसिंह आणि दत्त ॥
गुलामगिरिचा सत्वर अंत । जीवे भावे इच्छिती ॥ ११ ॥
परदेशींचें मोह जाल । घालवी बाबू गेनू हमाल ॥
श्री सिद्धेश्वर गोरे वकील । दारु पासूनी सोडाविती ॥ १२ ॥
ऐसे असंख्य देशभक्त । झाले होतिल पुढेही बहूत ॥
माय भूमिचें स्वातंत्र्य । रक्षितील सर्वस्वे ॥ १३ ॥

---

( पद ११ वे )

## —: भुपाळी :—

अवधि न उरला मांगल्याची लग्नघटी भरली ।
स्वराज्य देवी मळवट भरूनी पाटावर बसली ॥ धृ ॥
वाजंत्र्यांनो तुम्ही वाजवा तोफांचे चौघडे ।
लोकशाहिचे ताशे बडवा जशी वीज कडकडे ॥

रणशिंग फुंकुनी देश बंधुंना आमंत्रण धाडा ।
चला आणुया स्वातंत्र्याचा मिरवित वर घोडा ॥
वाटेमाजीं उचलुनि दुहिचा नारळ फोडावा ।
भ्याडपणाचा दहींभात मग उतरुनी टाकावा ॥
वाटेमाजीं दिवाभितांची दक्षिणार्थ दाटी ।
कुबेर धनही पडेल अपुरें स्वतंत्रतेसाठीं ॥
लग्नविधी निर्विघ्नपणानें पारचि पाडावा ।
स्वदेश घातक नीच वृत्तिचा आधिं बळी घ्यावा ॥
स्वतंत्रतेचें रम्य सरोवर चला पोहाण्याला ।
सुदर कमळें निवडक काढुनि वाहूं देवाला ॥
स्वतंत्र सारे, स्वतंत्र तारे, स्वतंत्रता वारे ।
नाश जवाळि ये परवशतेच्या अभेद्य दुर्गारे ॥ १ ॥

---

(पद १२ वे)

—: चाल—नव हिंद राष्ट्र झेंड्या :—

स्वातंत्र्य भारताला । आणाया गेला ॥ धृ ॥
लोकमान्य बळवंत दिगंवत । जन्मवरी झटला ॥ १ ॥
भारत भूषण भगतसिंहजी । फासावरि चढला ॥ २ ॥

श्री सिद्धेश्वर गोरे वकीलही । कामाला आला ॥ ३ ॥
आश्रमवासी गांधिमहर्षि । समरांगणि शिरला ॥ ४ ॥

---

## ( पद १४ वे )

—: चाल—प्रभु आज गमला मनी तोषला :—

कधि प्रभुवरा परम सुमंगलं । स्वातंत्र्याची प्रभात होईल ॥ धृ ॥
राष्ट्र ऐक्याचे ढोल बडवुनी । स्वातंत्र्याच्या नौबती झडतलि ॥ १ ॥
राष्ट्रास्तव तरुणांचे तांडे । भर इर्षेनें उड्या ठोकतील ॥ २ ॥
बंधु भगिनी निर्भय होउनि । हिंद भूमिची सेवा करतील ॥ ३ ॥
भिडवुनि खांदा खांद्याला जन । राष्ट्रीय झेंडा घेऊनी फिरतील ४

---

## ( पद १५ वे )

परवशता पाश दैवे । ज्यांच्या गळां लागला ॥ धृ ॥
सजिवपणें घडती सारे । मृत्यु भोग त्याला ॥ १ ॥
असूनि खास मालक घरचा । चोर ह्मणती त्याला ॥ २
सौख्य भोग इतरा सारे । कष्ट मात्र त्याला ॥ ३ ॥
मातृभूमि ज्याची त्याला । होय बंदीशाला ॥ ४ ॥

## ( पद १५ वे )

चाटीता पाय परक्यांचे । धर्म काय हा तुमचा ॥
कापितां गळे स्वजनांचे । धर्म काय हा तुमचा ॥ धृ ॥
स्वार्थ साधनासि मरतां । दास्य शृखंलाही वरतां ॥
घरदार परांचे भरतां । धर्म काय हा तुमचा ॥ १ ॥
शत्रुचें गुलाम बनतां । शत्रुला सलाम करता ॥
शत्रुच्या हितार्थ झटतां । धर्म काय हा तुमचा ॥ २ ॥
आप्तधन खुशाल हरता । शत्रुच्या घरांत भरता ॥
मायदेश ठार करता । धर्म काय हा तुमचा ॥ ३ ॥
परकीयांच्या लाथा खातां । अपमान मनीं ना गणता ॥
बेशरम पणानें हसतां । धर्म काय हा तुमचा ॥ ४ ॥

---

## ( पद १६ वे )

-: चाल—उद्धवा शांतवन करजा :-

सांग सांग तरुणा काय । दास्य हेच का तव ध्येय ॥ धृ ॥
कारागृही पडली आई । पाहते नि वदनाने ।
भालास लावुनी हात । न्हाते ती अश्रू जलाने ।
तोडून कडाकड बेडया । फेकाव्या निज हस्ताने ।
चाल—ऐशा निकराच्या वेळी । दुःखाची पेटे होळी ।

जन्मभू तिची आरोळी । तुज अरण्य रोदन होय ॥१॥
देशानें आशा केली । फिरविल दिवस हा माझे ।
जन्मभूमि वांछित होती । उचललि संकटी ओझे ।
राष्ट्रेच्छा कीं उघडील । स्वातंत्र्याचे दरवाजे ।
चाल—जन्मलास ज्या देशांत । वाढलास ज्या भूमींत ।
त्याचा अभिमान तुझ्यात । सांग सांग तरुणा काय ॥२॥

---

(पद १७ वे)

उठा बंधुनो उठा भगिनिनो । स्वातंत्र्याने जगण्याला ।
पारतंत्र्य हे लाजिरवाणे । आपुल्या भारत देशाला ॥ १ ॥
विलायतेच्या व्यापाऱ्यानी । गुलाम केले आपणाला ॥
म्हणूणी त्यांच्या मालावरती । बहिष्कार सत्वर घाला ॥२॥
थोर थोर आपले पुढारी । काय सांगती ते ऐका ।
इंग्लंडाला देश शत्रुला । एकहि पैसा देऊ नका ।
कपड्यापायी परदेशाला । एकही पैसा देऊ नका ॥ ३ ॥
गुजराथेच्या बार्डोलीचा । कित्ता डोळ्यापुढें धरा ।
सर्वस्वावर उदार होऊनि । मायभूमीला मुक्त करा ॥ ४ ॥

पेशावरचे पठाण पडले । शांति युध्द हे लढत.ना ।
विजयी विश्व तिरंगा प्यारा । झेंडा उंचा धरताना ॥ ५ ॥
बंधु भगिनिनो तयार व्हावे । करावयास बलिदान ॥
भारतमाता स्वतंत्र्य होता । सकळ जगाचे कल्याण ॥ ६ ॥

---

( पद १८ वे )

रणशिंग फुंकिलें कोणी । स्वातंत्र्य महायुद्धाचें ॥
उन्मत्त गजेंद्रालागी । अव्हान आर्यसिंहाचे ॥
मायभू मुक्त करणार । परदास्य पाश हरणार ॥
गर्जना महात्माजींची ।
स्वातंत्र्य समर वीराची ।
शांतीच्या वीर वराची ।
पाळोनि अनत्याचार । स्वातंत्र्य हिंद घेणार ॥ १ ॥
मरणाचे भय कोणाला । विषयांध क्षुद्र जीवाला ॥
जात मात्र तितुका गेला । मृत्युका कुणाला चुकला ॥
वीरासम रणि मरतांना । सोहळा सुखद आर्यांना ॥
भारभूत जीवन न्यावें ।
का वीर मरण सोसावें ।

देशाच्या कामा यावे ।
बंधुनो करा सुविचार । स्वातंत्र्य पर्व हें थोर ॥ २ ॥
शिव सिंहाच्या छाव्यांनो । व्हा उठा सज्ज आर्यांनो ।
परदास्य तिमिर नाशाला । द्या साह्य महा भागाला ।
सत्याग्रह शुभ शस्त्रांनी । करूं मुक्त आर्य भूजननी ।
सामर्थ्य पाशवी असले ।
विजयी न जगीं कधिं झालें ।
सत्याचें बळ परि अपुळें ।
इतिहास साक्ष देणार । सत्याचा जय होणार ॥ ३ ॥

---

( पद १९ वे )

वाजे शिंग । सुरु होय कायद भंग ॥ धृ ॥
झाले वीर पुढें बिनिवाले ।
उत्साहाचे घेऊनि भाले ।
नव धैर्यानें स्वार निघाले ।
चढला रंग । सुरु होय कायद भंग ॥ १ ॥
शांति ब्रह्माचे मूळ जयाचें ।

संगर तुंबर चालू साचे ।
येथें नांव नसे द्वेषाचें ।
प्रेम विहंग । सुरुं होय कायदा भंग ॥ २ ॥
वीरा वीर समोरी भिडती ।
देश हिताच्या प्रेमे लढती ।
धारातीर्थी पुण्यें पडती ।
ना सुख संग । सुरुं होय कायदे भंग ॥ ३ ॥
आता भितो कोण तुरुंगा ।
लावा अगारही या अंगा ।
अथवा फाशीवरी तनु टांगा ।
संगरी दंग । सुरुं होय कायदे भंग ॥ ४ ॥
डागा जलदबारि तोफेला ।
सोडा वरतुनि कुलपी गोळा ।
अथवा कांहीं करा जनतेला ।
संग करी दंग । सुरुं होय कायदे भंग ॥ ५ ॥
आतां नाहीं धर्म न जात ।
भारत एकचि कुल वा गोत ।
हृदयी राष्ट्र हिताची ज्योत ।
दीप पतंग । सुरुं होय कायदे भंग ॥ ६ ॥

येथें नच हिंसेला थारा ।
वाहे शांती सुखाचा वारा ॥
ठेवि शांत ' वसन्त विहारा " ।
कमली भृंग । सुरुं होय कायदे भंग ॥ ७ ॥

---

(पद २० वे)

ठ दे झुगारुनि बेडी । दास्यांत तुला जी जखडी । मर्द तूं ॥ धृ ॥
न्याचा लोखंडाची । बेडी ती बेडीच साची । बधनी ॥
लखलखीत कांचनें घडली ।
ह्मणुनि कां ढिली कधिं पडली । बंधनीं ॥
दासां जरि पदिं तुडविलें ।
हस्तें वा कुरवाळीलें दासची ॥
मग ऊठ, मनानें धीट, थेटची वाट,
त्वरें स्विकारी, त्वरें स्विकारी ।
जय भारतची ललकारी गर्जवी ॥ १ ॥

( पद २१ वे )

{ राष्ट्र कार्य करित असतां फाशीची शिक्षा झालेला एक निरपराधी देशभक्त आपल्या आईस ह्मणतोः— }

माने धीर धरी शोक आवरी जननी। भेटेन नउ महिन्यांनी ॥धृ॥
कां परक्याला बोल उगिच लावावा। दैवानें धरिला दावा ॥
लाभेल कधीं सांग कुणाला जगतीं। या जळत्या घरीं विश्रांती॥

चालः—घेऊनि उशाला साप।
येईल कुणाला झोप।
हा सर्व इश्वरी कोप।

ही परवशता करते भयंकर करणी ॥ १ ॥
सांगतो तुला शपथ घेऊनि आई। मरणाला भ्यालो नाहीं ॥
आठवे मनी श्री गितेचे सार। का नश्वर तनु जाणार ॥

चालः—हृदयाचें मोजूनि ठोके।
बघ शांत कसे आहे ते।
वाईट वाटते इतुकें।

तव सेवेला अंतरलो मी जननी ॥ २ ॥
लाभते जया वीर मरण भाग्याचे। वैकुंठ पदीं तो नाचे ॥
दे जन्म मला मातृ भूमिचे पोटीं। पुन्हां पुन्हां मरणासाठीं ॥

चालः—मागणे हेच श्री हरिला ।
मातृभूमि उध्दरण्याला ।
स्वातंत्र्य रणी लढण्याला ।
तव शुभ उदरी जन्म पुन्हा घेवोनी ॥ ३ ॥

( पद २२ वे )

—ः पद दारुचे चालः—आनंद कंद ऐसा ः—
मम हिंद बंधु ऐका सोडाहि दारु सोडा ॥ धृ ॥
दारुसि ध्यान जडलें स्वातंत्र्य हे बुडालें ।
उघडा हो डोळे उघडा ॥ सोडाहि ० ॥ १ ॥
नरकांत लोटी दारु विलयास नेईल अब्रु ।
त्रुरवि धनादि कपडा ॥ सोडा० ॥ २ ॥
सरकार डाव साधी जनतेसि लावी नादी ।
दुष्मान घालि खोडा ॥ सोडा० ॥ ३ ॥
शपथेस घ्याच आतां स्मरुनीहीं आर्य माता ।
दारुसी हात जोडा ॥ सोडा० ॥ ४ ॥

(पद २३ वे)

—: पद दारुचे चालः- जगावे हिंदभूसाठीं :—

दारुचे बंड मोडाया । शक्ति दे हे प्रभो राया ॥ धृ ॥
राज्य हे राक्षसी म्हणुनी । मिळाला दारुला थारा ॥
चालले अबकारी खातें । प्रजेच्या घोर संहारा ॥ १ ॥
कितीकांची घरेंदारें । दारुनें ठार बुडविली ॥
कुटूंबें झाली अज्ञान । स्वधर्मा सोडूनी गली ॥ २ ॥
दारुनें देह परतंत्र । दारुनें मनहि परतंत्र ॥
जोवरी नाहि सामर्थ्य । कशाचें देश स्वातंत्र्य ॥ ३ ॥
पुरे संबंध दारुचा । नको हा खेळ दारुचा ॥
दारुने घात जिवाचा । दारुनें नाश देशाचा ॥ ४ ॥
स्मरुनिया हिंद मातेला वंदूनी पूज्य गांधींना ॥
प्रार्थना हीच सर्वांना । घालवा दारुच्या व्यसना ॥५॥

(पद २४ वें)

—: चालः—आनंद कंद ऐसा :—

मम देशबंधु भागिनी । खादी स्वदेशी घ्यावी ॥ धृ ॥
परकीय राजनिती । धनराशी साठ कोटी ॥

लुटूनी मंदांध झाली । खादी स्वदेशी घ्यावी ॥ १ ॥
उद्योग ठार केला । बेकार देश झाला ॥
परतंत्र भूमि बनली । खादी स्वदेशी घ्यावी ॥ २ ॥
सैतानी राजसत्ता । व्हावा नकोशी चित्ता ॥
स्वातंत्र्य स्थापण्याला । खादी स्वदेशी घाला ॥ ३ ॥
देशभक्त बंधु अपुले । कारागृहात पडले ॥
जतींद्रस्वर्गी गेला । खादी स्वदेशी घाला ॥ ४ ॥
राष्ट्र ध्वजा धरोनी । वंदून मातृभूमि ॥
जयनाद एक बोला । खादी स्वदेशी घाला ॥ ५ ॥

( पद २५ वे )

-: चाल:-बाबा भूक लागलि :-

देश बंधुनो सावध होउनी । विचार क्रांति करा जरा ॥धृ॥
परकीयांचे कापड सोडूनी । शुध्द स्वदेशी खादी वरा ॥ १ ॥
नोकरशाही गांजुन घेते । अपमानाची चीड न कां ॥
कापड त्यांचे तरी घेऊनी । दूध सापा पाजूं नका ॥ २ ॥
शुध्द स्वदेशी खादी मध्यें । स्वातंत्र्याचें बीज वसे ॥
स्वावलंबन राप म्हणोनी । सूत कातणे धर्म असे ॥ ३ ॥

डोळे उघडा मोहा सोडा । शुध्द स्वदेशी घ्या कपडा ॥
साठ कोटी निधीं वाचवू । जुलुमाला पाडू आळा ॥ ४ ॥
स्वातंत्र्याच्या मंगल रविचा । पूर्व तयारी ही खादी ॥
खादी पायीं भूमातेला । जिकडे तिकडे आबादी ॥ ६ ॥

---

( पद २६ वे )

–: चालः–घनश्याम सुंदरा श्रीधरा :–

घनश्याम गोजिरा गांधीजी कारागृहीं गेला ।
उठा लौकरी बंधु भगिनिनों चला संगराला ॥ धृ ॥
जगांत कोणी नसे पाहिलें युध्द सुरुं झालें ।
एक पक्ष सजला शस्त्रानें दुसरा शांतिबलें ॥
सत्य बोलणें सत्य चालणें सत्या आचरणें ।
सत्य शस्त्र घेवोनि करीं तें गांधी समरीं गेलें ॥
चालः–मनी शांति धरणें सत्यता हेचि ब्रीद पहिलें ।
क्रोधाग्नि गिळुनी पाहिजे चित्त शुध्द केलें ।
तमःासि जिंकाया सत्य ते पहा सिध्द झालें ॥
चालः–उदया चलि फांकली प्रभा स्वतंत्र सुर्य आला ॥
उठा लौकरी बंधु भगिनिनों चला संगराला ॥ १ ॥

चक्र सुदर्शन श्री विष्णूच्या करिं शोभे साचें ॥
त्यानें गांधी करीं घेतलें रुपचि चरख्याचें ॥
शुभ्र सुंदरा खादी वापरा देशा उध्दरा ॥
विलायती मालावरि घाला आज बहिष्कारा ॥
चालः- भेदभाव सोडा अनुसरा राष्ट्रीय धर्माला ॥
सत्यव्रत सेवा दयेचा श्रेष्ठ धर्मशाळा ॥ २ ॥

( पद २७ वे )

## —= पदे हिंदी =—

### —* वीर बनो वीर बनो *—

वीर बनो वीर बनो । सब भारतवासी वीर बनो ॥ धृ ॥
सरकारी कानून चूर करो । पर-देशी हुकुमत दूर करो ॥
दूर करो दूर करो । दर-देशीको अब दूर करो ॥ १ ॥
हम मालिक है अपने घरके । क्यों-दस्तंदाजी क्यों करते ॥
बन्द करो बन्द करो । यह-गुलामखाना बंद करो ॥ २ ॥
इतर पहनो अब हथकडियां । डरनेवाले पहनो चुडियां ॥
काल बनो काल बनो । गो-रोंका अबसे काल बनो ॥ ३ ॥

सब सपूत उठो साथ चलो । इस-शासनको बरबाद करो ।
याद रखो याद रखो । अब-आजादी राज्यको याद रखो ॥४॥
यह नादिरशाही नाश करो । जुल्मके इसको साफ करो ॥
कूदपडो कूदपडो । सब-सत्याग्रहमें कूद पडो ॥५॥

(पद २८ वे)

-: मंजूर सर कटाना :-

भारत न रह सकेगा हरगिज गुलामखाना ।
होगा आजाद होगा आया है वह जमाना ।
खून खौलने लगा है हिंदूस्थानियोंका ।
कर देंगे जालिमोंका हम बंद जुल्म ढाना ॥ १ ॥
कौमी तिरंगे झंडेपर जां निसार अपनी ।
हिन्दु, मसीह, मुसलिम गाते है यह तराना ॥ २ ॥
अब भेड और बकरी, बनकर न हम रहेंगे ।
इस पस्त हिंमतीका होगा कहीं ठिकाना ॥ ३ ॥
परवाह अब किसे है जेल और दमनकी ।
एक खेल हो रहा है फांसी पे झूल जाना ॥ ४ ॥
भारत वतन हमारा भारत के हम है बच्चे ।
माताके वास्ते है मंजूर सर कटाना ॥ ५ ॥

( पद २९ वे )

-: नहि रखनी नहि रखनी :-

नहि रखनी नहि रखनी । सरकार जालीम नहि रखनी ।
मुसलमानका मक्का खोया । सिखोंका दरबार ॥ जालीम० ॥
जलियानवाले बागके भितर । निर्दोषोपर गोली चलाकर ।
मारे कैक हजार ॥ जालीम० ॥
पेशावरमे सितम गुजारा । निःशस्त्रोंको गोलीसे मारा ।
स्त्री बच्चोंपर लाठी चलाया । ऐसी है सैतान ॥ जालीम ॥
लालाजीको लाठीसे मारा । जतींद्रदासको भूखे मारा ।
भगतसिंगको फांसी दीया । ऐसी है सैतान ॥ जालीम० ॥
गांधीजीको जेलमें डाला । जवाहीरको जेल बिठाया ॥
ऐसा है सैतान ॥ जालीम० ॥

---

( पद ३० वे )

शिर जावे सो जावे पर आझादि घर आवे ॥
यह जान फना हो जावे पर आझादि घर आवे ॥ १ ॥
नौ जवानकी ये सेना अब नही है रुकनवाली ॥
यह गर्दन ऊंची उठाई नही जुल्मसे झुकनेवाली ॥ २ ॥

हम खुनी जिगरके प्याले दुष्मनको पिलानेवाले ॥
हम नहि है बुझदिल आदम हा चाहे सो करनेवाले ॥४॥
मंजूर हमे है मरना चल अपना साज सजाले ॥
चल बतादे ताकद तेरी अब हम नही थकनेवाले ॥ ४ ॥
हम मरेंगे लढते लढते नहि लडाई मरनेवाली ॥
मैदान न होंगा खाली जबतक ना होर खुसाली ॥ ५ ॥

---

(पद ३१ वें)

—: सताओ जितना जी चाहे :—

हम हकपर जान देते है । सतालो जितना जी चाहे ॥
दबेंगे हम नहि हरगिज । दबालो जितना जी चाहे ॥धृ॥
नहि मरनेंसे डरते हम । भला फिर जेल क्या है ।
ये गोले फूल है हमको । सतालो जितना जी चाहे ॥ १ ॥
हमारा खून बे खटके । बहाओ जितना जी चाहे ।
हटेंगे हम न सत्वोंसे । हटाओ जितना जी चाहे ॥ २ ॥
हमारे देशका शासन । हमारा है करेंगे हम ॥
जमेगा अब न इसपर रंग । जमाओ जितना जी चाहे ॥३॥

उठा है केतु भारतका । बजा है शंख गांधीका ।
विजय आखिर हमारी है । टलावो जितना जी चाहे ॥४॥

( पद ३२ वे )

बने हम हिंदके योगी । धरेंगे ध्यान भारतका ॥
उठाकर सत्यका झंडा । करेंगे ध्यान भारतका धृ ॥
गलेमे शक्तिकी माला । पहेनकर ज्ञानकी कफनी ॥
पकडकर त्यागका डंडा । रखेंगे मान भारतका ॥ १ ॥
जलाकर कष्टकी होली । उठाकर इष्टकी झोली ॥
जमाकर संतकी टोली । करें उत्थान भारतका ॥ २ ॥
हमारे जन्मका सार्थक । हमारे मोक्षका मारग ॥
हमारे स्वर्गका कारन । यही उद्यान भारतका ॥ ३ ॥
यही जीवात्मा सबका । यही है आत्मा सबका ॥
यही परमात्मा सबका । विजय निशान भारतका ॥ ४ ॥

( पद ३३ वे )

भारत जननी तेरी जय हो विजय हो ॥ धृ ॥

तूं शुध्द और बुध्द ज्ञानकी आगार ।
तेरे विजय सूर्य माथां उदय हो ॥ १ ॥
हो ज्ञान संप.ा जीवन सुफल हो ।
संतान तेरी अखिल प्रेममय हो ॥ २ ॥
आवे पुन्.ां कृष.ा देखे दशा तेरी ॥
सरीतां सरोंमेंभी बहता प्रणय हो ॥ ३ ॥
माबरके संकल्प पूरण करे ईश ।
विघ्न और बाधा सभीका प्रलय हो ॥ ४ ॥
गांधी रहे और तिलक यहा आवे ।
अरविंदलाला महेंद्रकी विजय हो ॥ ५ ॥
तेरे लिये जेल हो स्वर्गका द्वार ।
बेडीके झन झन मे वीणाकी लय हो ॥ ६ ॥
कहता खलील आज हिंदु मुसलमान ।
सब मिलके गावो जननि तेरी विजय हो ॥ ७ ॥